स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक **05–11–2011** रोजी दुपारी **03–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## <u>उपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | श्री. विकास उर्फ बाबा माधवराव मैंद | सदस्य |
| 3. | श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |
| 4. | सौ. उषा गोपाल बोहरे | सदस्या |
| 5. | श्री. भारतभूषण ऋषीपंत गायधणे | सदस्य |
| 6. | सौ. मंदाताई उर्फ आक्का गंगाधर लेंडे | सदस्या |
| 7. | श्री. प्रविण आत्माराम सांदेकर | सदस्य |
| 8. | श्री. अरविंदरपाल सिंग उर्फ बब्बी बावा | सदस्य |
| 9. | श्री. अरुण वसंतराव डवरे | सदस्य |
| 10. | श्री. झुल्फेकार अहमद शेख अहमद भूट्टो | सदस्य |
| 11. | सौ. सिंधु रामाजी उईके | सदस्या |
| 12. | सौ. कल्पना सुरेश डवरे | सदस्या |
| 13. | श्री. मोहम्मद कामील अंसारी मो. हसन | सदस्य |
| 14. | डॉ. मिलींद माने | सदस्य |
| 15. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |

## <u>अनुपस्थित सभासद</u>

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. बंडू उर्फ सुधिर हरिदास राऊत | सदस्य |

## <u>उपस्थित अधिकारी</u>

1) श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 108</u> :— म.न.पा. ठराव क्र. 222, दि. 05.05.2011 अन्वये म.न.पा. चे दवाखाने पी.पी.पी प्रकल्पा अंतर्गत चालविण्याकरिता दर मागविण्यात आलेले होते. त्यात पांचपावली सुतिकागृह प्रकल्प राबविण्याकरिता ई.ओ.आय. मार्फत खाजगी संस्थाकडून दर मागविण्यात आले होते. त्यानुसार उक्त सुतिकागृह चालविण्याकरिता मे. झुनी इंटरप्राईजेस, नागपूर यांचे दर कमी असून त्यांना पांचपावली सुतिकागृह प्रती महिना रु. 1/— प्रती. चौ. फुट दरानुसार जागा उपलब्ध करुन देण्यास्तव व नमुद दरात प्रथम 10 वर्षाकरिता प्रकल्प राबविण्यास्त मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास नामंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 109</u> :— वार्ड क्र. 11, मानकापुर करिता, वर्ष 2011—12 चे मंजूर अंदाजपत्रकातील पद क्र. 719 म.रा.वि.म.चे खांबावर फेज टाकणे करीता करण्यात आलेली तरतूद रु. 1 लक्ष, पद क्र. 327, वार्डातील तातळीचा कामे या शिर्षा अंतर्गत वार्ड क्र. 11 करीता असलेल्या तरतुदीत वळती करण्याचा प्रश्न विचारात घेवून त्यामुळे क्षेत्रिय कार्यालय क्र. 10 चे वर्ष 2011—12 च्या अंदाजपत्रकात होणाऱ्या प्रस्तावति पुनःर्नियोजनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 110</u> :— स्थायी समिती ठराव क्र. 891 दिनांक 11.03.2011 अन्वये उद्यानांची देखभाल लोकसहभागातून करण्याकरीता प्राप्त रुचीदर्शक (Expression of Interest) तपासून निवडलेल्या व्यक्ती, सेवाभावी संस्था व्यावसायिक प्रतिष्ठान इत्यादीकडून ऑफर्स मागविले असता.

अ) लेण्ड्रा पार्ककरीता प्राप्त झालेली रामदासपेठ नागरीक मंडळाची रु. 1500/—ची ऑफर
ब) बालभवन उद्यानाकरीता मे. विदर्भ इन्व्हीरॉनमेंटल सर्व्हिसेस याची रु. 1,11,000/— ची ऑफर
क) भाऊजी पागे उद्यानाकरीता श्री. मिलिंद साबळे यांची रु. 2,10,000/— ची ऑफर मंजूर करण्यास तसेच
ड) त्रिशताब्दी उद्यानाकरीता श्री. सिध्दीदात्री महिला नागरी सहकारी पत संस्थेकडून व शंकरनगर उद्यानाकरीता प्राप्त झालेल्या पाच EOI कारांकडून ऑफर्स मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 111**:— झोन क्र. 10 मधील मानकापूर रिंग रोड वरील प्रकाश व्यवस्थेत सुधारणा करण्यास्तव रु. 43,14,880/—च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 112**:— नागपूर महानगरपालिककतील वाहने/मशीनरी देखभाल दुरुस्ती अंतर्गत स्पेअर पार्ट खरेदी/दुरुस्ती, बॅटरी खरेदी, सिवरलाईन मशिन स्पेअर पार्ट खरेदी/दुरुस्ती, टायर—टयुब दुरुस्ती व नविन टायर टयुब खरेदी, हार्डवेअर मटेरियलस खरेदी ईत्यादिचे द्विवार्षीक दर करार करण्याकरिता वेग—वेगळया मॉडेल अंतर्गत वाहने/मशिन संबंधीत लागणारे स्पेअरपार्ट/दुरुस्ती व ईतर साहित्य खरेदी/दुरुस्ती अंतर्गत ऑयटमचे निम्मतम (सिलींग) दर निश्चित करण्याकरिता ई—निविदा मागविण्याचे प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान करते

**ठराव क्रमांक 113**:— वार्ड क्र. 14, येथे विविध ठीकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा कामास्तव रु. 34,99,906/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 114**:— वार्ड क्र. 88, हम्पयार्ड रोड ते लोकमत चौकापर्यत रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रु. 64,76,465/— च्या प्राकलनास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 115**:— म.न.पा. ठराव क्र. 222 दिनांक 05.05.2011 अन्वये म.न.पा. चे दवाखाने पी.पी.पी. प्रकल्पा अंतर्गत चालविण्याकरीता दर मागविण्यात आलेले होते. त्यात सदर रोग निदान केंद्र येथे सिटीस्कॅन,सोनोग्राफी,इको,कलर डॉपलर व एक्स—रे इत्यादि सुविधांकरीता मे. नाईसा डायलो केअर, गांधी ले आऊट, नागपूर यांचे सर्वात कमी दर (CGHS दरापेक्षा 7.5 टक्के कमी दर) असल्यामुळे त्यांना प्रकल्प राबविण्यास्तव एक रुपया प्रती चौरस फुट दराप्रमाणे जागा उपलब्ध करुन देण्यास्तव नमूद दरानुसार प्रथम पाच वर्षाकरीता दवाखाना/प्रकल्प चालविण्याकरीता मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सामान्य प्रशासन विभागाने सादर केलेल्या कायदयाच्या सल्लागाराचे प्राप्त अभिमतानुसार मे. नाईसा डायलोकेअर यांना हा कंत्राट देता येणार नाही. असे स्थायी समितीचे मत आहे.

करिता या निविदेतील L-2 यांना बोलावून वाटाघाटी व योग्य निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यास हि स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते. निर्णय झाल्यावर स्थायी समितीची मंजूरी प्रशासनाने घेणे आवश्यक राहील असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

**ठराव क्रमांक 116**:— स्थायी समिती ठराव क्र. 94 दिनांक 07.10.2011 अन्वये किडनी व डालीसीस सेंन्टर महाल रोग निदान केंन्द्र येथे चालू करण्यास्तव मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. मे. अश्विनी किडनी व डायलीसीस सेंन्टर यांचे दिनांक 21.10.2011 च्या पत्राच्या अनुषंगाने सिरो पॉझिटीव्ह रुग्णा करीता 1000/— रुपये (रु.500/— म.न.पा. व रु. 500/— रुग्ण) व सिरो निगेटीव्ह करीता रु. 1200/— रुपये (रु.500/— म.न.पा. व रु. 700/— रुग्ण) दर घेण्याचे कबुल केलेले आहे. हा दर प्रति रुग्णास राहील.

सबब मे. अश्विनी किडनी आणि डायलीसीस सेंन्टर यांना उपरोक्त दरात रुग्णांवर उपचार करण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन सिरो पॉझिटीव्ह रुग्णाकरिता रु. 1200/— (रु. 600/— म.न.पा. व रुग्ण रु. 600/— ) सिरो निगेटीव्ह करिता रु. 1000/— (रु. 500 म.न.पा. व रुग्ण रु. 500/—) या कार्यालयाने सुचविलेल्या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 117**:— वार्ड क्र. 132 व 127, येथील शहेंशाह चौक ते हुडकेश्वर रोड चे डांबरीकरणास्तव रु. 45,50,569/— राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता देणे व निविदा बोलाविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 118**:— वार्ड क्र. 132, आशिर्वाद नगर भागातील ताजबाग शहेनशाह चौक ते रिंग रोड (द्वारका कॉम्प्लेक्स) पर्यतच्या रस्त्याचे खडीकरण, फुटपाथ नाली व डांबरीकरण करण्याचे उर्वरित कामास्तव रु. 70,91,796/— रकमेचे सन 2011—2012 या आर्थिक वर्षात पद क्र. 681 मधून प्रावधान उपलब्ध करणे तसेच या कामाचे कंत्राटदार मे. एस.के. गुरुबक्षानी, यांचे मंजूर दरानुसार कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाने केलेल्या निवेदनानुसार मे. एस.के. गुरुबक्षानी यांनी उर्वरित काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. नमुद केल्यामुळे रु. 42,00,000/— लक्ष पर्यंतचे काम कंत्राटदाराकडून पूर्ण करुन घ्यावे व उर्वरित काम करण्यास्तव कार्यालयाने नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 119**:— वार्ड क्र. 94, आझमशहा ले—आऊट, भगत कॉलनी येथे महर्षी सुदर्शन धामचे निर्माण करण्याचे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. एस.आर.खरपकर, यांची प्राकलनीय दरापेक्षा 9.35 टक्के कमी दराची रु. 39,20,612/— राशीच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 120:— मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी सभागृहात वाचून दाखविला व त्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

—: ठराव :—

नागपूर महानगरपालिकेच्या नगर रचना विभागातील शहरातील नागरिकांच्या अर्जावरील इमारत परवाना व रेखाचित्र मंजूरीचे काम पुर्वी केंद्रीय कार्यालयातर्फे चालत असे. परंतू क्षेत्रिय कार्यालयातील कामकाजाचे विकेंद्रीकरण झाल्यानंतर क्षेत्रिय कार्यालयातील लोककर्म विभागाकडून 200 चौ.मी. च्या आतील बांधकामांना इमारत परवाना व रेखाचित्र मंजूरीचे अधिकार क्षेत्रिय कार्यालयातील सक्षम प्राधिकारी यांच्याकडून मा. आयुक्त यांनी दिलेल्या प्रत्यायोजन अधिकारानुसार करण्यात येत होते. क्षेत्रिय कार्यालयातील लोककर्म विभागाचा व्याप बघता वरील क्षेत्रफळाच्या मंजूरीची ओरड नागरिक व नगरसेवकांची नव्हती.

परंतू आता असे निर्दशनास आले आहे की, सामान्य प्रशासन विभागाचे आदेश क्र. जी.ए.डी./08/डी.ई.एल. दि. 31/10/2007 अन्वये उपरोक्त मंजूरीची मर्यादा 500 चौ.मी. पर्यंत प्रत्योयोजन आदेशानुसार देण्यात आलेली आहे. क्षेत्रिय कार्यालयातील कामाचा व्याप अत्यंत वाढलेला असून लोककर्म विभागातील अधिकारी व कर्मचारी विकास कामांशी व इमारतीच्या परवानगी देण्याच्या कामात नागरिक व नगरसेवकांना योग्य न्याय देवू शकत नाही व यामुळे दैनंदीन कामांत नागरिकांना त्रास होत आहे.

दुसरी कडे केंद्रीय कार्यालयातील नगर रचना विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडे काम नसल्यासारखे आहे. करिता उपरोक्त 500 चौ.मी. चे देण्यात आलेले प्रत्यायोजन आदेश मा. आयुक्त यांनी 200 चौ.मी. पर्यंत करावे अशी ही स्थायी समिती आयुक्त यांच्याकडे शिफारस करते.

कृपया या ठरावास मंजूरी प्रदान करावी.

सुचक :— हस्ता/— भारतभूषण गायधने
अनुमोदक :— हस्ता/— सौ. उषा गोपाल बोहरे
:— हस्ता/— सौ. मंदा गंगाधर लेंडे

**<u>ठराव क्रमांक 121</u>** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर